# ब्रह्मसरोवरीचा परमहंस



हिंदुस्थानी अध्यात्मात चार प्रकारच्या संन्यास दीक्षा सांगितल्या जातात, त्यातली परमोच्च दीक्षा म्हणजे परमहंस दीक्षा. इ. स. १८३६ ते १८८६ या केवळ पन्नास वर्षांच्या आयुष्यात फार मोठ्या आध्यात्मिक कार्याची पायाभरणी करून भारतवर्षालाच नव्हे तर संपूर्ण जगाला उपकृत करणाऱ्या 'श्रीकृष्ण परमहंस' या श्रेष्ठतम सत्पुरुषाच्या जीवनपटाचे सिंहावलोकन करता लक्षात येतं की, ते अत्युच्च कोटीच्या परमहंस या उपाधीला सर्वार्थाने पात्र होते. रामकृष्ण परमहंस यांच्या मंगळवारी १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या १७५व्या जयंतीनिमित्त :-

पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभुतांवर म्हणजेच पर्यायाने या पंचमहाभुतांपासून उत्पन्न झालेल्या देह, मन आणि अंत:करणावर ज्याने संपूर्ण विजय मिळवला आहे तो मनुष्य परमहंस पदाला पात्र होतो. श्रीरामकृष्णांच्या प्रारंभिक जीवनपटाचं अवलोकन केलं तर असं दिसतं की, परमहंस पदाला आवश्यक अशी देहाची, मनाची आणि बुद्धीची अवस्था तयार होण्यासाठीची मार्गक्रमणा त्यांच्या बाबतीत अगदी लहान वयापासून सुरू झाली. कालीमातेची प्रखर आणि उत्कट भक्ती करणाऱ्या श्रीरामकृष्णांना तरुणपणीच साक्षात महाकालीचे दर्शन झाले. पुढे जगन्मातेच्या आज्ञेनुसार पंजाब प्रांतातील तोतापुरी महाशयांकडून त्यांनी संन्यास धर्माची दीक्षा ग्रहण केली. जी अवस्था प्राप्त करण्यासाठी साधकांना काही वर्षे अविरत कष्ट करावे लागतात, ती समाधी अवस्था अनुग्रहानंतर अल्पावधीतच त्यांना प्राप्त झाली असे वर्णन चरित्रात अहे. या चमत्कृतीपूर्ण घटनेचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की, अप्राकृत स्वरूपातल्या, कोणत्याही अपेक्षेशिवाय केलेल्या द्वैतोपासनेमुळेच भक्तीरसाने परिपूर्ण झालेल्या या सत्पुरुषाला तत्काळ अद्वैताचे ज्ञान घडले. जणू आधी फूल आणि मग फळ या निसर्ग नियमाला अपवाद झाला! परंतु हा चमत्कार किंवा भाग्याचा महिमा नसून त्यांनी एकनिष्ठेने केलेल्या एकान्तिक तपश्चर्येचा हा परिणाम होता.

तमोगुणाचे प्रतीक मानण्यात येणाऱ्या महाकालीची उत्कट भक्ती करणारा हा उपासक स्वत: मात्र अत्यंत शांत आणि स्थितप्रज्ञ होता! एकाग्रता, संपूर्ण निष्ठा, आज्ञापालन या उत्तम भक्तलक्षणांबरोबरच दृढ आत्मविश्वास हा अजून एक महत्त्वाचा गुण त्यांच्या व्यक्तिचित्रात ठायी ठायी जाणवतो. या आत्मविश्वासाचं उत्तम उदाहरण म्हणजे, 'जो राम होता आणि जो कृष्ण होता तोच या देहामध्ये रामकृष्ण म्हणून आला आहे,' हे श्रीरामकृष्णांचे ठाशीव उद्‌गार! हे उद्‌गार म्हणजे अहंकारयुक्त दर्पोक्ती नसून, 'अहं ब्रह्मस्मि' या तत्त्वाचा स्वानुभूतीच्या आधारावर केलेला उद्घोष आहे! सर्व उत्तम गुणांनी युक्त असलेल्या श्रीरामकृष्णांचा स्वभाव मात्र एखाद्या बालकासारखा सरळ, कोणावरही विश्वास टाकणारा, निर्मळ आणि पूर्णत: निर्भय असा होता. मृत्यूचीसुद्धा भीती न बाळगणाऱ्या या महामानवाला गर्वाचा स्पर्श कधी झालाच नाही. 'जे काही घडलं ते जगन्मातेच्या कृपेने घडलं' असंच ते आयुष्यभर म्हणत राहिल्याचं आढळतं, इतकी पूर्ण शरणागतीची अवस्था त्यांनी साध्य केली होती.

एकाही पांडित्यपूर्ण ग्रंथाची रचना न करता किंवा कोणतेही वक्तृत्व कौशल्य न दाखवता, केवळ साध्या सोप्या बोधामृतामुळे असंख्य शिष्यांना त्यांनी प्रभावित केलं. त्यातही प्रत्येक शिष्याच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य असाच उपदेश त्यांनी दिला. आयुष्यभर अपरिग्रहासारखे काही नियम त्यांनी अंगिकारले, त्यांच्या संख्येने मोठ्या असलेल्या शिष्यवर्गात प्रामुख्याने तीन शिष्यांचा उल्लेख करावा लागेल. एक म्हणजे अद्वैत वेदांताचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण विश्वभर करणारे स्वामी विवेकानंद, दुसरे केशवचंद्र सेन आणि तिसरे कवी गिरीश. या तिघांकडून अत्यंत भिन्न प्रकारच्या साधना आणि कार्य त्यांनी करून घेतलं.

स्वत: श्रीरामकृष्णांनी आयुष्यभर वेगवेगळ्या प्रकारची साधना केली. नवविधाभक्तीतली सर्व नऊ प्रकारची भक्ती त्यांनी केली. सगळ्या प्रकारच्या तंत्र साधना, मंत्र साधना, यंत्र साधना अशा निरनिराळ्या एकंदर चाळीस प्रकारच्या साधना त्यांनी केलेल्या आढळतात. एवढेच नव्हे तर या प्रत्येक साधनामार्गात ते अत्युच्च पातळीपर्यंत पोहोचले. 'जगन्मातेचा साक्षात्कार आणि समाधी अवस्था आयुष्याच्या पूर्वार्धातच प्राप्त झाली असतानाही त्यानंतर एवढ्या साधना तुम्ही का केल्या,' असं त्यांना जेव्हा विचारण्यात आलं तेव्हा त्यांनी सांगितलं, 'समुद्रामध्ये अनेक प्रकारची रत्नं असतात. त्यातलं एक रत्नं मी शोधायला गेलो तर पूर्ण समुद्रच मला सापडला. असं जरी घडलं असलं, तरी इतर कोणकोणती रत्नं आहेत त्याचीही ओळख मला व्हावी असा मी वेळोवेळी जगन्मातेकडे हट्ट धरला आणि जगन्मातेने तो पुरवला; त्यामुळेच या साधना माझ्याकडून घडल्या.' सगळ्या चराचरात एकच ईश्वर भरलेला आहे आणि कोणत्याही मार्गाने साधना केली तरी त्याच्यापर्यंत पोहोचता येतं ही शिकवण देण्याकरिता त्यांनी घराचं रूपक वापरलं आहे, 'एखाद्या घरात जायला जसे अनेक दरवाजे असतात तशाच निरनिराळ्या साधना म्हणजे ईश्वराकडे पोहोचण्याचे वेगवेगळ्या दिशेचे दरवाजे आहेत. तुम्ही जो दरवाजा निवडाल त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवा, पण जो दुसऱ्या दरवाजाने जातो आहे त्याचा मार्ग चुकीचा आहे किंवा वाईट आहे असं कधीही म्हणू नका.' हे रूपक म्हणजे त्यांच्या समग्र उपदेशांचे सार आहे.

जीवन जगत असतानाच जीवनमुक्त अवस्था प्राप्त करणारा हा अवलिया योगी जितका तन्मयतेने देवघरातल्या कालीमातेची पूजा करीत असे, तितक्याच तन्मयतेने येशू ख्रिस्ताच्या तसबिरीसमोरही भक्तिभावाने नृत्य करीत असे. कोणताही आकार डोळ्यासमोर आला तरी मूळ तत्त्व हे ईश्वरच आहे हे लक्षात घेऊन त्याच्यासमोर नतमस्तक होण्याचं जे कौशल्य श्रीरामकृष्ण परमहंसांनी साध्य केलं ते आपल्यालाही आत्मसात करता आलं पाहिजे.

(बापट गुरुजी, ओम सद्‌गुरू प्रतिष्ठानच्या बदलापूर, बोरिवली आणि खोपोली स्थानांवर गुरूपदी विराजमान आहेत. संपर्क - bhende@indiatimes.com)

- बापट गुरुजी

रविवार पुरवणी गुरुजी

शोध

आपली प्रतिक्रिया कळवा

PRE-BUDGET RALLY

Ads by Guruji

STOCKS & SECTORS TO OUTPERFORM IN 2010

Ads by Guruji

STOCKS & SECTORS TO OUTPERFORM IN 2010

# After 3rd Quarter Results